Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Oct. 2022 Issue - 60 Vol. 1

CURRENT GLOBAL REVIEWER

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

SHIVAJI COLLEGE HINGOLI

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**Oct. 2022 Issue - 60 Vol. 1**

**Chief Editor**

**Mr. Arun B. Godam**

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**Shaurya Publication , Latur**

16. लोकशाहीतील नैतिकता — 54
प्रा. डॉ. सुनिलदत्त सोपान गवरे

17. लोकशाहीचे सामाजिक आधार आणि आव्हाणे. — 57
डॉ. विलास सोमाजी पवार

18. आव्हानाच्या विळख्यातील भारतीय लोकशाही — 60
प्रा.चंद्रकांत एन. पुरी

19. भारतातील दारीद्रय : लोकशाहीसमोरील आव्हान — 63
सुदर्शन उत्तमराव ढाले

20. "भारतीय लोकशाही समोरील समकालीन समस्या आणि आव्हाने" — 67
प्रा.डॉ. जी.डी. घोडे

21. "भारतीय लोकशाही समोरील समकालीन आव्हाने आणि उपाययोजना" — 69
प्रा.डॉ.सतिष मैलारी कटके

22. भारतीय लोकशाहीची तत्त्वे : यश आणि अपयश — 72
डॉ. डी.के. खोकले

23. लोकशाहतील प्रसार माध्यमांची भूमिका व महत्व — 76
डॉ. विकास बी चांदजकर

24. निवडणुक व्यवस्थेतील सुधारणा : भूतकाळ आणि भविष्य काळाचा आढावा — 78
प्रा.डॉ.भालेराव सुधाकर नारायण

25. प्रादेशिकवाद — 82
प्राचार्य डॉ., तळणीकर एस.जी.

26. भारतीय लोकशाही समोरील समकालीन समस्या आणि आव्हाने — 88
प्रा.डॉ.सचिन रामराव काळवांडे

27. भारतीय लोकशाही समोरील समस्या आणि आव्हाने — 91
प्रा. गुरुनाथ मावंजी घुटे

28. राजकारणाचे गुन्हेगारीकरण: भारतीय लोकशाहीपुढील एक आव्हान — 94
प्रा. डॉ. बालासाहेब जी. जोगदंड

29. शाश्वत विकासासाठी पर्यावरणाची आवश्यकता : एक राजकीय अध्ययन — 100
प्रा. डॉ. स्वामी विरभद्र गुरप्पा

30. 'संत साहित्यातील लोकशाही मुल्य' — 103
डॉ.श्रीराम मारोतराव कऱ्हाळे

31. भारतीय लोकशाहीतील भ्रष्टाचार : एक आव्हान — 105
डॉ. चांगदेव निवृती मुंढे


PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 60, Vol. 1 Oct. 2022 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# 'संत साहित्यातील लोकशाही मुल्य'

डॉ.श्रीराम मारोतराव कऱ्हाळे
मराठी विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

---

महाराष्ट्रात बाराव्या शतकामध्ये विविध संप्रदाय आपापल्यापरीने समाजकल्याणचे कार्य करीत होते. महाराष्ट्रात नाथसंप्रदाय, महानुभव संप्रदाय ,वारकरी संप्रदाय, वीरशैव लिंगायत संप्रदाय असे प्रमुख संप्रदाय कार्य करीत होते. प्रत्येक संप्रदायाची विचारधारा ही एकमेकापेक्षा वेगळी होती म्हणून समाजातील लोक जी विचारधारा आपल्याला रुचेल त्या विचारधारेच्या मागे लागली होती. त्या संप्रदायात त्यांनी प्रवेश करून समाधान मिळवले होते. नाथसंप्रदायामध्ये ज्ञानाचा वसा गुरुकडूनआपणघेतल्या नंतरतो शिष्यांना द्यायचा, असा संकेत होता. त्यामुळे ते तत्वज्ञान सामान्य माणसापर्यंत पोहोचू शकत नव्हते. ज्ञानापासून समाज वंचित राहत होता. या संप्रदायामध्ये समानतेचा हक्क डावलण्यात आलेला होता. स्वातंत्र्य समता बंधुता या मानवी मूल्यांचा अंगीकार या संप्रदायांमध्ये नव्हता. म्हणून संप्रदायाची तत्त्वज्ञान हे बंदिस्त स्वरूपात होते. असे तत्त्वज्ञान सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचवणे हे गरजेचे होते.

आदिनाथ गुरु सकळसिद्धांचा मच्छिंद्रनाथाचा मुख्य शिष्य, मच्छिंद्राने बोध गोरक्षाशी केला गोरक्ष वळला गहिनीनाथा गहिनीनाथेनिवृत्ती दातार ज्ञानदेव सारविले बोलविले. अशी गुरु परंपरा नाथसंप्रदायात होती. नाथ संप्रदायात ज्ञानदानाची परंपरा वारसा रुपाने पुढे जात होती . नाथ संप्रदायाचा मूळपुरुष आदिनाथ होता. या आदिनाथाकडे असलेले ज्ञान तो कोणत्याही शिष्याला देऊ शकत नव्हता. जो त्याचा मुख्य शिष्यआहे त्यांना दिले जात असे. अन्य शिष्य त्यापासून वंचित राहत असत. आदिनाथाचा मुख्य शिष्य मच्छिंद्र होता तर मच्छिंद्रना मुख्य शिष्य गहिनीनाथ होता. आणि गहिनीनाथाचा मुख्य शिष्य निवृत्तीनाथ होता . निवृत्तीनाथा लाजे ज्ञान गहिनीनाथाने दिले. तेच ज्ञान निवृत्तीनाथाने ज्ञानेश्वराला दिले. ज्ञानेश्वरांनी संस्कृतमध्ये असलेलेहे ज्ञान मराठी भाषेत रुपांतरीत करून सर्वसामान्य मराठी भाषिकांपर्यंत पोहोचण्याचे कार्य केले.नाथ संप्रदायातील शेवटचा पुरुष म्हणजे संत ज्ञानेश्वरहोय.

संत नामदेवांनी वारकरीसं प्रदायाची स्थापना केली. या संप्रदायांमध्ये समाजातील स्त्री - पुरुष, शूद्र-अति शुद्र कोणत्याही जातीधर्मातील व्यक्तीला स्थान होते. अर्थात स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता या लोकशाही मूल्याचा पाया वारकरी संप्रदायात आहे.

समाजातील कोणत्याही जातीपातीच्या व्यक्तीला ईश्वराची सेवा करता येऊ शकते. जातीयता वारकरी संप्रदायात पाळली जात नाही. पंढरीचा विठ्ठल हा वारकरी संप्रदायाचा समन्वयक आहे. ईश्वराचे अस्तित्व हे चराचरामध्ये असूनजाती-धर्मातील स्त्री पुरुष कुणीही त्यांची स्मरण करून भक्ती करू शकतो. याची जाणीव संत नामदेवांनी समाजाला दिली ईश्वराला जातीभेद मान्य नाही जातिभेद ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मितआहे. हे समाजाला सांगण्याचे कार्य संत नामदेवाचेआहे. वारकरी संप्रदायाची पताका संत नामदेवाने पंजाबपर्यंत नेलेली आहे तसेच दक्षिणेपर्यंत ही नेलेली आहे. संत नामदेवांनी संपूर्ण भारत भ्रमण केलेले आहे. संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचा प्रसार आणि प्रचाराचे कार्य फार मोठ्या जोमाने केले. वारकरी. संप्रदायांमध्ये अठरापगडजातीधर्मातीलस्त्री-पुरुषांना एकत्रित करून वारकरी संप्रदाय वाढविला. त्यांनी वारकरी संप्रदायाची नीतीमूल्य समाजामध्ये रुजवण्याचे कार्य केले.

बाराव्या शतकामध्ये समाजात जातीय विषमता, अस्पृश्यताही शिगेला पोहोचली होती. सर्वसामान्य माणसाला जगणे असाह्य झाले होते. अशा अवस्थितेत सापडलेल्या समाजाला योग्य दिशा देण्याचे काम संत नामदेवांनी केले आहे. संत नामदेवांनी काशीयात्रा करून आल्यानंतर चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये मांवंडा जेवणाचा कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमात विविध जातीधर्मातील लोकांनी स्पृश्य - अस्पृश्य, जातीयता न पाळता एकत्र पंगतीत बसून मांवंडाच्या भोजनाचा लाभ घेतला. संत नामदेवांनी ही प्रचंड परिवर्तनाची लाट वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून पूर्ण केलेली आहे. आजच्या लोकशाहीची मूळ तत्वे ही संत साहित्यात असलेली आपल्याला दिसून येतात. समाजामध्ये समता निर्माण करण्यासाठी माणसाने आचरण कसे करावे यासंदर्भात संत तुकाराम लिहितात.

'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे।उदास विचारे वेचकरी॥धृ. ॥
उत्तमचि गती तो एक पावेल।उत्तम भोगील जीवखाणी॥
पर उपकारीने पैं परनिंदा।पर स्त्रिया सदा बहिणी माया॥'१

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

समाजामध्ये विषमता वाढलेली आहे. सामाजिक विषमता कमी करायची असेल, स्वातंत्र्य समता बंधुत्वाचा अंगीकार करायचा असेल तर आपले व्यवहार हे उत्तम प्रकारचे असले पाहिजे. आपल्याला ज्या गोष्टीमुळे त्रास होतोल त्या गोष्टीमुळे दुसऱ्याला सुद्धा त्रास होईल. याची

Special Issue 60 , Vol. 1 Oct. 2022 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

जातीत आपल्या अंगी आली पाहिजे तरच विश्वबंधुत्व निर्माण होईल म्हणून आचरण चित्तशुद्ध असले पाहिजे जेव्हा आचरण आणि चित्त शुद्ध नसते तेव्हा विषमता वाढीस लागते विषमता वाढीस लावणाऱ्याबद्दल संत तुकाराम लिहितात,

'अंत्यज ब्राह्मण जळो त्याचे तोंड।काय त्यासी रांडप्रसवली
वैष्णवांचा भार धन्य त्याची माता।शुद्ध उभयतां कुळयाती'[2]

जात ही सामाजिक कर्तृत्व ठरू शकत नाही त्यासाठी माणसाचे आचरण आणि चित्त हेच कर्तृत्व ठरवीत असते, माणूस कोणत्याही जातीमध्ये जन्माला तरी त्याचा आचरण चित्तशुद्धा असेल तर तो श्रेष्ठ असतो.

समाजामधील विषमता जातीयता अस्पृश्यता ,विटाळ या बाबींमुळे स्वातंत्र्य समता बंधुत्व या मूल्यावर गदा येते यासंदर्भात संत चोखामेळा म्हणतात,

'वेदासी विटाळ शास्त्रासी विटाळ।पुराणेअमंगळ विटाळाचीं॥
जीवासी विटाळ शिवासी विटाळ ।काया अमंगळ विटाळाची॥
ब्रह्मिया विटाळ विष्णू सी विटाळ।शंकरा विटाळ अमंगळ ||
जन्मतां विटाळ मरतां विटाळ चोखा म्हणे विटाळ आदि अंती॥'[1]

विटाळाची व्याप्ती सर्वत्र असेल तर तो विटाळ का म्हणून पाळावा आणि समाजात असमानता का निर्माण करावी. चोखामेळा समाजासमोर असा प्रखड सवाल करतात.

ज्ञानेश्वरांनी पसायदानामध्ये विश्वबंधुत्वाची संकल्पना मांडली आहे विश्वाच्या कल्याणाची मागणी ईश्वराकडे केलेली आहे हे सर्वमूल्य लोकशाहीत त्याची निगडित आहे.

निष्कर्ष :

- लोकशाहीची स्वातंत्र्य, समता, बंधुता ही महत्त्वाची मूल्यआहेत.
- लोकशाहीला टिकवायचे असेल तर या मूल्याची जोपासना झाली पाहिजे .
- लोकशाहीत माणसाला स्वातंत्र्य असते.
- लोकशाही समानतेच्या तत्वावर चालते.
- समाजात सर्वांना समान न्याय मिळतो.
- बंधुता या तत्त्वामुळे समाजातील एकमेकाबद्दल असलेली परकेपणाची भावना जाऊन आपलेपणाच्या भावनेचा उदय होतो.
- लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी ही मुल्ये आवशयक आहेत.

संतांनी आपल्या अभंगातून आपल्या विचारातून ह्या मूल्यांना एकत्र बांधून समाज बळकट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संदर्भ टिपा:

1) प्राचीनमराठीकविताभागएक - संपादकसाहेबखंदारेलोकविद्याप्रकाशनपरभणीपृष्ट 78
2) उनि,पृ. 78
3) उनि, पृ. 90

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI